**सरकारतर्फे सा.क्र.३**

**शपथेवर**

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | कुमार चंद्रकांत शेजुळ, |
| **वय** | : | ३२ वर्षे , धंदा : शेती, |
| **राहणार** | : | नागापुर, ता.- नेवासा, जि. अहमदनगर |

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** -

१. दि. ०२/०१/२०२३ रोजी पोलिसांनी मला जळके बु. गट नं. ७४ येथे बोलवले होते.घटनास्थळ मला सुनिता शिंदे यांनी दाखविले. घटनास्थळ हे गट नं. ७४ पश्चिम दिशेला बांधावरील बाभळीच्या झाडाखाली जळके बु. येथे होते. घटनास्थळी काही गवत कापलेले व काही दबलेले होते. पोलिसांनी घटनास्थळ पाहुन पंचनामा केला व तो मला वाचुन दाखविला व मी त्यावर सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३३** देण्यात येते. त्यावेळी माझ्यासोबत नवनाथ उत्तम मते हा देखील होता. घटनास्थळ पंचनामा दुपारी ०३.०० ते ०४.०० च्या दरम्यान दि. ०२/०२/२०२३ रोजी करण्यात आला.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे विद्वान वकिल श्री. आर. यु. पागिरे यांचे मार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. पंचनाम्याकरीता पोलिस ससाणे यांनी बोलाविले होते. ससाणे यांनी मला फोन करून बोलाविले होते. सदर फोन दुपारच्या दरम्यान आला होता. परंतु निश्चित वेळ आता मला सांगता येणार नाही. घटनास्थळापासुन माझ्या गावचे अंतर २० ते २२ कि.मी. असेल. घटनास्थळी मी साधारण: एक ते दोनच्या दरम्यान गेलो होतो. पंचनामा अर्धा तास सुरू होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही त्यानंतर लगेचच तेथुन गेलो. घटनास्थळी चार ते पाच जण होतो. घटनास्थळी शांताबाई शिंदे, संदिप शिंदे, नवनाथ मते, मी व ससाणे असे होता. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी ही माझी बहिण आहे. फिर्यादी व आरोपीचा पुर्वी

रस्त्यावरून वाद चालु आहे किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या बहिणीला मदत करण्याकरीता खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याकरीता घटनास्थळी न जाता पोलिस ठाण्यात मी सही केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
**स्वाक्षरीत/-**
(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. ४, नेवासा.

दिनांक :१९/०७/२०२५.